I-O

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** पठारी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0709 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/12/2025 01:26

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Date From (दिनांक पासून):** 16/12/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/12/2025
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Time From (वेळेपासून):** 17:44 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/12/2025 **Time (वेळ):** 00:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/12/2025 00:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पाथरी शहराचे अलीकडे, पोखर्णी फाटा पाथरी,पाथरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** महेश मारुती पाटणकर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दत्त मंदीर परिसर, गंगाखेड,गंगाखेड,गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सामाजिक वनिकरण कार्यालय, सेलु ,सेलु,सेलु,सेलू,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9870313157

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल गणेशराव फड | | | 1. वागदरा,दत्त मंदीर परिसर, गंगाखेड,गंगाखेड,गंगाखेड, परभणी,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकारतर्फे फिर्याद
दिनांक 17/12/2025
मी महेश मारुती पाटणकर वय 55 वर्ष पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी मोनं. 9870313157

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो कि, मी 7 महिन्यांपासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे पोलीस उप अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे. आज दिनांक 16/12/2025 रोजी आम्ही लाप्रवि कार्यालयात हजर असताना तक्रारदार पांडुरंग शिंदे रा. मानोली यांनी त्यांची तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगितली कि, मौजे मानोली ता. मानवत जि. परभणी शिवारात गट क्र 443 मध्ये 28 आर शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीवर 112 बांबु वृक्षांची लागवड केली आहे. सदर बांबु वृक्ष लागवडीसाठी शासनाकडे कुशल कामाचे बिल 1,73,280/- रुपये मिळण्यासाठी मी रितसर बिलाची कागदपत्रे सामाजिक वनिकरण कार्यालय, सेलु येथे आॅक्टोंबर-2025 मध्ये सादर केली होती. त्यासंबंधाने दिनांक 13/12/2025 रोजी मी सामाजिक वनिकरण कार्यालय, सेलु येथील वनपाल फड यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला बिलावर सही करुन प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यिासाठी एकुण 1,73,280/- रुपये बिलाच्या 15 टक्के रक्कमेची मागणी केली आहे. त्यावर मी त्यांना विनंती केली असता त्यांनी तडजोडअंती 10,000/-रुपये मागणी केली. त्यामुळे मी त्यांना नाईलाजास्तव 2,000 /-रुपये रक्कम दिली. त्यावेळी वनपाल फड यांनी उर्वरीत रक्कम 8,000/-रुपये दोन-तीन दिवसात घेवुन येण्यास सांगितले.

मी आज दिनांक 16/12/2025 रोजी पुन्हा वनपाल फड यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी मला उर्वरीत 8,000/-रुपये लाचेची मागणी करुन स्वतः किंवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी हि विनंती आहे" अशा आशयाची तक्रार देवुन कागदपत्रे सादर केली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आगार प्रमुख, परभणी आगार यांना पत्र देवुन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत माहिती देवुन तक्रारदार यांची लेखी तक्रार वाचण्यास दिली. त्यानंतर दोन्ही पंचांनी तक्रारीची खात्री केल्यानंतर दिनांक 16/12/2025 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक 16/12/2025 रोजी तक्रारदार यांनी विनंती केल्याप्रमाणे आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे षासकीय वाहन सापळा कार्यवाहीसाठी लागणा-या किट साहित्यासह पाथरी शहराचे अलीकडे एका शेतात आडोशाचे ठिकाणी थांबलो. तसेच तक्रारदार पांडुरंग शिंदे हे दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एमएच 38 एच 4802 वर आले. सदर ठिकाणी आमचे सुचनेवरून सपोउपनि/निलपत्रेवार यांनी तक्रारदार पांडुरंग शिंदे व दोन्ही पंचांना व्हाईस रेकाॅर्डर व वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती देवुन व्हाईस रेकाॅर्डर सुरू करून आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य व्हाईस रेकाॅर्डर व्दारे नविन मेमरीकार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर तक्रारदार शिंदे यांनी वनपाल फड यांना फोन करुन विचारपुस केली. त्यावेळी फड यांनी थोडया वेळाने फोन करुन सांगतो असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने फड यांनी फोन करुन तक्रारदार यांना रत्नापुर जवळील टोल नाका जवळ बोलावले. त्यानंतर आमचे सुचनेवरून सपोउपनि/निलपत्रेवार यांनी व्हाईस रेकाॅर्डर 16ः57 वाजता चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आतुन टाकुन त्याचेसांबत पंच क्र. 1 घाटुळ यांना वनपाल फड यांची भेट घेण्यासाठी रत्नापुर जवळील टोल नाक्याजवळ पडताळणी कार्यवाही करीता तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 घाटुळ हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी सपोउपनि/निलपत्रेवार यांनी तक्रारदार शिंदे यांचेकडुन व्हाईस रेकाॅर्डर काढुन 17ः13 वाजता बंद केला. आम्ही

पंच क्र. 1 घाटुळ यांना विचारपुस केली असता त्यांनी सांगितले कि, टोलनाक्यावर उभी असलेल्या चारचाकी गाडीतील पुढील सीटवर बसलेले वनपाल फड असल्याचा तक्रारदार यांनी इशारा केला. त्यानंतर वनपाल फड यांनी तक्रारदार यांना चारचाकी मध्ये बसण्याचा इशारा केला. त्यामुळे तक्रारदार हे गाडीत बसले. त्यावेळी गाडीचे पाठीमागील सिटवर एक व्यक्ती बसलेला होता. त्यामुळे मी गाडीजवळ थोडया अंतरावर बाहेरच थांबुन राहिलो.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्याबाबत माहिती दिली कि, पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व वनपाल फड यांची भेट झाली. सदर भेटी दरम्यान तक्रारदार यांनी त्यांचे बांबु वृक्षलागवडीचे बिलावर सही करुन वरिष्ठ कार्यालयास पाठविण्याविषयी चर्चा केली. त्यावेळी वनपाल फड यांनी इतरांचे 15 टक्के प्रमाणे घेतो. तुमचे कमी घेतो असे म्हणुन 10,000/-रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी वनपाल फड यांनी तुम्ही मला यापुर्वी 2,000/-रुपये दिले आहेत. आता 8,000/-रुपये राहिले आहे असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर आम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर लोकसेवक फड यांचा मोबाईल क्रमांक 9767277880 व तक्रारदार शिंदे यांचा मोबाईल क्रमांक 9011115462 यावर त्यांचे आपसात फोनवर संभाषण झाले. त्यामध्ये वनपाल फड यांनी तक्रारदार यांना विचारपुस केली असता तक्रारदार यांनी 8000/-रुपये होत नाहीत. 5,000/-रुपये जमा होत आहेत असे सांगितले. त्यावर वनपाल फड यांनी 5,000/-रुपये रक्कम स्विकारण्यास संमती दर्शवुन लाचरक्कम घेवुन येण्यास सांगितले. त्यावरुन सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांचेकडील 500/- रूपयाचे दराच्या 10 नोटा एकुण 5,000/-रूपये पंचा समक्ष सापळा कार्यवाही करता आमचेकडे जमा केले. त्यानंतर शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही सुरू केली. आमचे सुचनेप्रमाणे पोह/आदमे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष किट मधुन अॅथ्राॅसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प काढुन त्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना माहिती देवुन प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानतर आम्ही सापळा कार्यवाही अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या. सापळा कार्यवाही नंतर वनपाल फड यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांना गळयातील रूमाल हातास गुंडाळण्याचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. तसेच पंच क्र 1 घाटुळ यांना अंगातील जरकीनची/जॅकेटची डोक्यावर बांधलेली टोपी काढण्याचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोह/आदमे यांनी तक्रारदार पांडुरंग शिंदे यांनी जमा केलेले 5,000/-रूपये ज्यात 500/-रुपये दराच्या 10 चलनी नोटांना अॅथ्राॅसिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात अलगद ठेवुन दिले. त्यादरम्यान तक्रारदार यांना वनपाल फड यांचा फोन आला व पाथरी षहराचे अलीकडे पोखर्णी फाटयावर भेटण्यास सांगितले. त्यानंतर सपोउपनि/निलपत्रेवार यांनी व्हाइस रेकाॅर्डर 17ः44 वाजता सुरू करून तक्रारदार यांचे शर्टच्या आतुन गळयात लटाकवुन देवुन पंच क्र 1 घाटुळ यांचेसोबत मोटारसायकलने वनपाल फड यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात आले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र 2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने गेलो.

तक्रारदार यांनी त्यांची मोटारसायकल पाथरी शहराचे अलीकडे पोखर्णी फाटयावर एका चारचाकी वाहनजवळ थांबवली. तेथे तक्रारदार शिंदे हे पंच क्र 1 घाटुळ यांचेसह चारचाकी जवळ गेले. त्यामुळे सापळा पथक शासकीय वाहनातच अलीकडे थांबले. काही वेळाने तक्रारदार यांनी त्यांचेकडील रुमाल हातास गुंडाळून लोकसेवकाने लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन लागलीच आम्ही चारचाकी वाहनासमोर आमचे शासकीय वाहन उभे केले. त्यानंतर तक्रारदार यांनी चारचाकी वाहनात समोर बसलेल्या व्यक्तीकडे इशारा करुन वनपाल फड असल्याचा इशारा केला. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे सपोउपनि/निलपत्रेवार यांनी तक्रारदार यांचे कडील व्हाईस रेकाॅर्डर 17ः51 वाजता बंद केले. त्यावेळी आम्ही सदर वाहनातील वनपाल फड यांना सोडुन इतर 2 व्यक्तींना गाडीतुन उतरण्याचा इशारा केला. त्यानंतर वनपाल फड यांनी पथकास पाहुन त्यांचे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशातील लाचरक्कम काढुन वाहनाचे हॅण्डबेरक जवळ ठेवुन दिली. सदर रक्कम आम्ही पंचासमक्ष जप्त केली आहे. त्यादरम्यान सदर सापळा कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला आहे.

तरी दि. 16/12/2025 रोजी तक्रारदार पांडुरंग गंगाधर शिंदे वय 42 वर्ष व्यवसाय - शेती, रा. मानोली ता. मानवत यांनी दिलेल्या तक्रारी वरून पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक अमोल गणेशराव फड, वनपाल, अतिरीक्त कार्यभार वनपरीक्षेत्र अधिकारी/ सामाजिक वनिकरण कार्यालय, सेलु यांनी तक्रारदार यांचे बांबु वृक्षलागवडीचे कुशल कामाचे बिलावर सही करुन प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठविण्यासाठी तडजोडअंती 10,000/-रुपये लाचेची मागणी केली. तसेच तक्रारदार यांचेकडुन यापुर्वी 2000/-रुपये मिळाल्याचे कबुल करुन उर्वरीत 8,000/-रुपये स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन दि. 16/12/2025 रोजी 17ः44 ते 17ः51 दरम्यान पाथरी शहराचे अलीकडे पोखर्णी फाटा

येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक अमोल गणेशराव फड, वनपाल, अतिरीक्त कार्यभार वनपरीक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनिकरण कार्यालय, सेलु यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन 5,000/- रुपये लाचरक्कम स्विकारली आहे.

म्हणुन माझी अमोल गणेशराव फड, वनपाल, अतिरीक्त कार्यभार वनपरीक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनिकरण कार्यालय, सेलु रा. वागदरा ता. गंगाखेड ह.मु. दत्त मंदीर परिसर, गंगाखेड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
LAXMAN MADHAVRAO KENDRE(I (Inspector)) / PQBN82264 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.पाथरी जि.परभणी

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** LAXMAN MADHAVRA

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** POBN82264